## SECTION - II
## विभाग – II

**Note :** This section contains fifteen (15) questions each to be answered in about thirty (30) words. Each question carries five (5) marks. **(5x15=75 marks)**

**टीप :** या विभागात पंधरा (15) प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर सुमारे तीस (30) शब्दांत द्यावयाचे आहे. प्रत्येक प्रश्नास पाच (5) गुण आहेत. **(5x15=75 गुण)**

**6.** रामदासांच्या पाच काव्यग्रंथांची नावे लिहा.

**7.** पेशवेकाल ते अव्वल इंग्रजी कालखंड या काळातील पाच सुप्रसिद्ध शाहीर कोण?

## ऐच्छिक II – तौलनिक साहित्याभ्यास

**21.** तौलनिक साहित्याभ्यास म्हणजे काय ते सांगून या अभ्यासाची व्याप्ती विशद करा.

**22.** 'प्रभाव' हा तौलनिक साहित्याभ्यासाचा एक महत्वाचा घटक आहे, असे तुम्हांस वाटते का? सकारण लिहा.

**23.** 'भारतीय साहित्यां'ची संकल्पना स्पष्ट करा.

**24.** भाषांतर हे कधीही संपूर्णत: यशस्वी होत नाही, असे असले तरी भाषांतरे होत राहाणे; हे साहित्यविकासाच्या दृष्टीने हिताचे का मानले जाते?

**25.** मराठी साहित्यावर पडलेल्या कन्नड साहित्याच्या प्रभावाचे स्वरुप सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

## ऐच्छिक III – स्त्रीवादी साहित्याभ्यास

**21.** स्त्रीवादी दृष्टिकोणातून साहित्याभ्यास करावयाचा म्हणजे नेमके काय करायचे ते विशद करा.

**22.** स्त्रीवादी साहित्यसमीक्षा पारंपरिक समीक्षादृष्टीतील कोणकोणत्या प्रथा नाकारते? – सकारण लिहा.

**23.** मराठीतील स्त्रीसंबद्ध प्रश्नांचे स्त्रियांनी केलेले लेखन कोणकोणत्या सामाजिक-सांस्कृतिक घटकांकडे लक्ष वेधते, ते सोदाहरण लिहा.

**24.** मराठीतील स्त्रीवादी कवितेचे विविध पैलू स्पष्ट करा.

**25.** मराठीतील स्त्रियांच्या कादंबरी लेखनाचा परिचय करुन द्या.

**किंवा**

## ऐच्छिक IV - ग्रामीण साहित्य

**21.** वाङ्मयीन समालोचनात ग्रामीण साहित्यनिर्मितीचा वेगळा विचार करावयास हवा, असे तुम्हास वाटते का? सकारण लिहा.

**22.** 'मराठीतील ग्रामीण साहित्यातून घडणारे समाजदर्शन एकांगी स्वरुपाचे आहे' – चर्चा करा.

**23.** मराठी ग्रामीण कादंबरी वाङ्मयाचे थोडक्यात समालोचन करा.

**24.** प्रतिमा इंगोले यांच्या ग्रामीण साहित्यविश्वाचा परामर्श द्या.

**25.** व्यंकटेश माडगूळकर यांच्या ग्रामीण साहित्यनिर्मितीचे स्वरुपविशेष सोदाहरण लिहा.

**किंवा**

## ऐच्छिक V - दलित साहित्य

**21.** दलित साहित्य का निर्माण झाले, त्याची कारणमीमांसा करा.

**22.** दलित साहित्यातून प्रकटणाऱ्या समाजाचे स्वरुप सोदाहरण विशद करा.

**23.** दलित स्त्रियांच्या आत्मकथनांतून प्रकटणाऱ्या स्त्री-प्रतिमांची वैशिष्ट्ये साधार लिहा.

**24.** दलित कवितेचे सामर्थ्य कोणत्या विशेषांत साठवले आहे?

**25.** बाबुराव बागूल यांच्या कथाविश्वातील वेदनेचे स्वरुप स्पष्ट करा.

